अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ५८२०

दिनांक :- २८/११/2020

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत</u>.
कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनकरिता क्षेत्रिय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या पथकाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाबाबत.

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/४१५६, दि.१६.०९.२०२०
५) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/५७९१, दि.२४.११.२०२०

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

त्यानुषंगाने क्षेत्रिय स्तरावर पथक स्थापन करण्यात आले असून, सदर पथकाने हॉटेल, रेस्टॉरंट, बार, मॉल, दुकाने तसेच सामाजिक अंतर ठेवणेचे (Social Distancing) पालन करणे आवश्यक असणाऱ्या अन्य आस्थापना या ठिकाणी पाहणी करून सामाजिक अंतर ठेवणे (Social Distancing) व सॅनिटाईजेशनचे नियमांचे पालन होते किंवा नाही याबाबत तपासणी करून कारवाई करणेबाबत आदेश प्रसृत करण्यात आले आहेत.

त्यामुळे यापूर्वीच सूचित करण्यात आल्यानुसार सदर कार्यवाहीबाबतचा दैनंदिन अहवाल दुसऱ्या दिवशी सकाळी १०:०० वाजेपर्यंत उप आयुक्त, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांचेकडे सादर करावा. उप आयुक्त, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांनी सदर अहवाल एकत्रित करून लगेच आमचेकडे सादर करावयाचा आहे.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
१) मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांजकडेस माहितीस्तव.
२) मा. महापालिका आयुक्त,
३) मा. अतिरिक्त आयुक्त (वि/इ) यांना माहितीस्तव.

**प्रती –** संबंधीत खातेप्रमुख/उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ ते ५/महापालिका सहाय्यक आयुक्त/ प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.